# मी एक निलंबित

दिनानाथ बन



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

## दिनानाथ बन

लिखित

स्वानुभव

# मी एक निलंबित

# मी एक निलंबित

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

मी एक निलंबित

दिनानाथ बन

पत्ता- पत्ता : २५/१/१, शिवराज नगर, कॉलनी नंबर २, रहाटणी,

पुणे – ४११०१७.

फोन नं – ९८६०५८७१०८.

Email : dinanathban@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : १७ जुलै २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# मी

# एक

# निलंबित

# भाग -१

पुस्तकाचे नाव : मी एक निलंबित

पुस्तकाचा प्रकार : सत्यकथा

लेखक : दिनानाथ केशव बन

पत्ता : २५/१/१, शिवराज नगर,
कॉलनी नंबर २, रहाटणी,
पुणे – ४११०१७.
फोन नं – ९८६०५८७१०८.

Email [dinanathban@gmail. com](mailto:dinanathban@gmail.com)

dinanathban@gmail. com

या पुस्तकातील सर्व पात्रे

सर्व प्रसंग

सर्व स्थळे

काल्पनिक नाहीत

फक्त कांही ठराविक नावामध्ये बदल करण्यात आला आहे.

पूर्ण सत्यकथा

# ऋणनिर्देश

मी मुळचा लातूर जिल्ह्यातील भोसा या गावचा, नोकरीनिमित्ताने पुणे येथे स्थाईक झालो. इयत्ता सातवीपर्यंत माझे शिक्षण मुळगावी व नंतर इयत्ता दहावीपर्यंत गावाशेजारील भिसेवाघोली या गावी झाले. लहानपणी पुण्याचे मला खूप आकर्षण होते. एकदा पुण्यात येऊन गेलो होतो, तेंव्हापासून पुण्यात रहायचे असे वाटत होते. पुणे शहराने मला भरभरून दिले. पुणे ही माझी कर्मभूमी आहे. पुण्याबद्दल मला आदर आहे. पुण्यात बोटावर मोजण्याएवढे दुष्ट लोक सोडले तर मला चांगली माणसे जास्त भेटले. जगाच्या पाठीवर कोठेही गेलं तरी सर्वच प्रकारची माणसे भेटणारच. नुसते गोड खायला मिळाले तर गोडाचीही किंमत कळत नाही. त्यासाठी इतर चवीही हव्याच. तिखट, आंबट बरोबर कारल्याचीही कडू चव हवीच.

आपण तरी सर्वगुणसंपन्न कोठे असतो? आणि जगात सर्वसंपन्न कोणीही नसतो. अडचणी व दुखः कोणाला चुकले आहेत. देवांनाही अडचणी व दुखः चुकले नाही. त्यांनाही संघर्ष करावा लागला. देवांनाही अपयश आले. त्यांनी कोणाकडे तक्रार करायची. माझ्यावर अन्याय झाला, मला अपयश आले. पण मी खचून गेलो नाही. कोठेही वाहवत गेलो नाही. कोणालाही त्रास होईल असे वागलो नाही. मी कधीही लाचार झालो नाही. आयुष्यात ताठ मानेनेच जगलो. कोणावरही राग काढला नाही. आतल्याआत दुखः पचवले.

त्यात मला साथ मिळाली ती माझ्या पत्नी माधवीची. तिने मला कधीही एकटे पडू दिले नाही. प्रत्येक वेळी मला धीर देत राहिली. माधवी माझी पत्नी आहे का मैत्रीण अजूनही मला प्रश्न पडतो. पत्नीची कर्तव्य पार पाडून ती मित्र आणि मैत्रिणीची भूमिकाही उत्तम पार पाडते. घरातली बाई डळमळीत असेल तर घर मोडायला किरकोळ कारणही पुरेसे असते पण घरातली बाई मजबूत असेल तर

कितीही संकटे येवोत. घर मोडत नाही. पडझड झालीच तर तिच्यात पुनर्निर्माण करण्याची क्षमता असते. त्यामुळे १९९७ नंतर मला मित्रांची कधी गरज पडली नाही. मला कशाचीच कमतरता पडली नाही. माझ्या जगण्याचे व अस्तित्वाचे सर्व श्रेय तिच्याकडे जाते.

दुसरी व्यक्ती म्हणजे माझी बहीण कमल. कमल म्हणजे कल्पवृक्षच, मला काय समस्या आहे ते तिला अचूक माहित असायचे. माझ्याकडे कधी पैसे नाहीत हे तिला अचूक माहिती असायचे. न मागता तिने बळेच मदत केलेली आहे. प्रत्येकवेळी धीर देण्यास हजर असे. आजही ती मला ज्यावेळी मला खूप गरज असते तेंव्हा न मागता आर्थिक मदत करते. पडत्या काळात सर्व नातेवाईक दूर पळतात, नातेवाईक पळाले, मित्रही पळाले. परंतु बहीण दूर गेली नाही.

आणखी माझे एक नातेवाईक श्री आनंद भारती साहेब. ते खरोखरच नावाप्रमाणे आनंदी व आनंद देणारे आहेत. मुंबई उच्च न्यायालयात दावा दाखल करायचा होता म्हणून मी त्यांच्याकडे ओळख असेल म्हणून गेलो. त्यांना सर्व कथन केले त्यांनी मला सरकारी वकील बघून दिला. उच्च न्यायालयात खूप खर्च येत असतो म्हणून त्यांनी खर्चासाठी दहा हजार रुपये दिले. प्रत्येक तारखेला त्यांच्याकडे राहण्याची ते सोय करीत असत. हे सर्व उच्च पदावर असलेले मान्यवर होते. त्यांना कधीही गर्व नव्हता.

तसे मला १९९७ पूर्वी अनेक मित्र होते. ते सतत सभोवताली असायचे. कोठेतरी वाचल होते की जहाज बुडायला लागले की जहाजातील उंदीर अगोदर पाण्यात उड्या मारतात. संकटकाळी एकही मित्र मदतीला धावला नाही. सर्वच्या सर्व पळाले होते. हीच नियती होती. परमेश्वराला हेच हवे होते. इमानदारीने काम केल्यास कसा अन्याय केला जातो हे जनतेला सांगावे. म्हणून ही सत्यकथा लिहीत आहे. यात कांही नावात थोडासा बदल करण्यात आला आहे. कहाणी तंतोतंत खरी आहे. भाग १ चा प्रतिसाद पाहून प्रमुख घटनेचा भाग २ प्रसारित करण्याचा विचार

आहे. कृपया वाचकांनी प्रतिसाद द्यावा, कांही सूचना असतील किंवा कांही मार्गदर्शन असेल ते अवश्य स्वीकार करण्यात येईल. उपकारकर्ते व मित्रांना व वाचकांना धन्यवाद देतो.

दिनानाथ केशव बन

(एक निलंबित )

पत्ता : २५/१/१, शिवराज नगर, कॉलनी नंबर २, रहाटणी,

पुणे – ४११०१७.

फोन नं – ९८६०५८७१०८.

Email : dinanathban@gmail.com

# मी एक निलंबित

लातूर जिल्ह्यातील मुरुड ते अंबेजोगाई रस्त्यावर भोसा नावाचे एक छोटेसे खेडेगाव. शंभर सव्वाशे घरे असलेली वस्ती. शहरापासून दूर असल्याने फारसा विकास नसलेले गाव. या गावात आमचे गोसावी समाजाचे दोन घरे. आद्य शंकराचार्य आमचे महागुरू. आम्ही मठाधिपती, आमचाही मठ आहे. आमचे समाजाचे अनेक ठिकाणी मठ आहेत, अनेक आखाडे आहेत. आध्यात्मिक ज्ञानाचा प्रसार करणे. तपसाधना, योगसाधना, पूजापाठ, ग्रंथ वाचन, कीर्तन, प्रवचन हे मुख्य काम. ज्ञान हीच संपत्ती आणि लोकांचा आदर हीच मिळकत. आम्हाला महाराज या नावाने संबोधले जाते. आजही आम्ही मुळगावी गेलो की आबालवृद्ध पाया पडून आशीर्वाद मागतात. आता काळ बदलला, लोकांचे पाया पडून घेणे नकोसे वाटू लागले. पूर्वीच्या प्रथा नकोशा वाटू लागल्यात. पूर्वीप्रमाणे धार्मिक शिक्षण राहिले नाही. आम्ही ही बदलत आहोत.

स्वातंत्र्य पूर्व काळातली घटना. स्वातंत्र्य सैनिक कै. केशव बन हे माझे वडील. आमच्या गावी शिक्षणाची सोय नसल्यामुळे त्यांचे शिक्षण कठीणच होते. त्यात प्लेगची साथ आली. माझे आजीआजोबा व माझे चार चुलते व त्यांचे कुटुंबीय त्या साथीतच गेले. वडिलांना कोणाचा आधार उरला नव्हता. त्यांनी आळंदी येथे येऊन वारकरी सांप्रदायाचे शिक्षण घेतले. भजन, कीर्तन, प्रवचन सुरु केले, एक ख्यातनाम कीर्तनकार म्हणून त्यांना ओळखू लागले. त्यावेळी स्वातंत्र्याची चळवळ सुरु होती काळाच्या ओघाने चळवळीत भाग घेतला. कीर्तनाच्या माध्यमातून लोकजागृती करू लागले. इंग्रज शिपाई आले की भजन सुरु होई ते परत जाताच पुन्हा चळवळीचे काम करीत. कीर्तनास आलेल्या लोकांतून कांहीजण फितूर होऊन

शिपायांना टीप देत असत. त्यामुळे वडिलांवर लक्ष ठेवले जात होते. त्यांना पकडण्यासाठी इंग्रज शिपाई शोध घेत असत. त्यामुळे त्यांना कधी एकटेच तर कधी कुटुंबासह लपत छपत दिवस काढावे लागत. वडील घरात न सापडल्यामुळे शिपाई माझ्या आईलाही त्रास देत. धमक्या देत, त्यामुळे तिलाही घर सोडून पळावे लागे. कधी ज्वारीचे शेतात, कधी उसाचे मळयात तर कधी कधी बाभळीच्या काटेरी झुडपात लपून बसावे लागे. क्रांतिकारीच्या घरच्या महिलांना पकडून त्यांना त्रास देऊन चळवळीची गुप्त माहिती मिळवली जात असे. त्यामुळे माझे वडील कोठे जातात, काय करतात, परत कधी येणार याची तिळमात्र माहिती माझ्या आईला देत नसत. एकदा त्यांना अटकही झाली होती. सुटून आल्यावर माझे आईला समजले होते.

आमचे गावातील तात्या गुरव हे त्या काळी गावठी दारू बनवीत असत. त्यांचेकडे संध्याकाळी दारू पिण्यासाठी इंग्रज शिपाई येत असत. दारूची नशा चढल्यानंतर त्यांची चर्चा चाले. उद्या कोणाला पकडायचे, कोठे धाड टाकायची , आज कोणाला पकडले हुकुम काय झाले. इत्यादी त्यांचे बोलणे एकूण ती सर्व माहिती तात्या गुरव माझे वडिलांना सांगत असे. मग माझे वडील त्यानुसार निर्णय बदलीत असत. १५ ऑगस्ट, १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. त्यात माझे वडिलांचा खारीचा का होईना वाटा आहे. याचा मला अभिमान आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले होते. आता कुटुंबाकडे लक्ष देणे गरजेचे होते. त्यांनी एक शिलाई मशीन विकत घेतली. कीर्तन प्रवचन याबरोबरच शिलाई काम करू लागले. मुलांचे शिक्षणासाठी गाव सोडले. मुरुड येथे राहायला गेले. मोठा मुलगा श्रीहरीचा कांही शिक्षणास रस दिसेना. पहिलीत दोन वर्षे घेतली मग शिरढोणच्या शाळेत घेतले. तेथेही तीन वर्षात कसाबसा तिसरी पास झाला. पुढे शिक्षण घ्यायचे नाही म्हणून रडू लागला. दुसरा मुलगा भागवत पहिलीत जाऊ लागला होता. त्यावेळी भोसा येथे शाळा उघडली असे समजल्याने पुन्हा कुटुंबासह मूळ गावी रहावयास आले. भागवत सातवीत शिकत होता. त्याच्यापेक्षा लहान

भरत तिसरीत शिकत होता. एके दिवसी भागवत अचानक गायब झाला होता. खूप शोध घेतला. वडिलांनी जवळजवळ एक महिना घोड्यावरून गावोगाव फिरून शोध घेतला, परंतु तो सापडला नाही. एक महिन्यानंतर त्याचे पत्र आले, त्याने सांगितले मी आळंदी येथे सुखरुप आहे. त्यास वडिलांनी पत्र पाठवले, एकदा परत येवून जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे तो आला. लहान भाऊ भरत यास शिक्षणास घेऊन जाण्याचा त्याने हट्ट धरला. शेवटी भरतला घेऊन तो आळंदीला गेला. श्रीहरीला किराणामालाचे दुकान घालून दिले होते. त्याने कसेबसे वर्षभर चालवले एकदिवस घर सोडून निघून गेला. करकट्टा येथे जाऊन राहिला. माझ्या दोन बहिणी व एका भावासह आम्ही भोसा येथे राहत होतो.

१९६६ साली वडील ग्रंथ वाचन करण्यासाठी शेजारील गाव गाधवड येथे गेले होते. वाचन झाल्यावर रात्रीच घोड्यावरून परत येणार होते. मी त्यावेळी पाच वर्षाचा होतो. त्यादिवशी वडील परत आलेच नाहीत. पहाटेच गाधवड येथून आमचा घोडा घेऊन एक महार आला.

त्याने आईला सांगितले “तुमच्या मालकांना बरे नाही तुम्ही लवकर चला.
”

आईने विचारले “काय झाले? कोठे आहेत ? नीट सांगा”

तो म्हणाला “तुम्ही लवकर चला बाकी मला कांही माहित नाही. ”

आई घरात गेली तोवर त्याने शेजारीच राहणाऱ्या चुलतभाऊ जगन्नाथ यांना सर्व कल्पना दिली. जगन्नाथने आईला कांहीच सांगितले नाही. फक्त सोबत येतो म्हणाला. ते तिघे चालत गाधवडला निघाले. गाधवड गाव जवळ आले. एक शेतातील झोपडी दिसत होती. त्याला कोप असे म्हणले जाई. कोपीजवळ जाताच महार म्हणाला “आत जाऊन बघा. ” आईने आत डोकावले. तिला धक्काच बसला. त्या कोपीत वडिलांना टाकले होते. तेथे कोणीही नव्हते. मुंगळे वडिलांना खात होते. तिने जोरात हंबरडा फोडला. जगन्नाथने प्रेत बाहेर ओढले. आईने वडिलांच्या

अंगावरचे मुंगळे काढायला सुरवात केली. हाताला मुंगळे चावत होती. रक्त काढत होती, मनात काहूर माजले होते. असे कसे झाले म्हणून आई मोठ्याने ओरडत होती. सकाळच्या त्या भयाण शांततेत आवाज घुमत होता. हळूहळू गाधवड या गावातील मानसे जमू लागली होती. कोणीही कोणाशी बोलत नव्हते, कुजबुजतही नव्हते. सर्व मुके झाले होते. असे कसे झाले म्हणून प्रत्येकाला विचारत होती पण त्यागावातील एकही माणूस बोलायला तयार नव्हता. त्या गावचा पोलीस पाटील आला व म्हणाला “ज्याच्या घरी ग्रंथ वाचन सुरु होते ते कोठेतरी पळून गेले आहेत.” पोलीसपाटील आईजवळ येऊन म्हणाला. “मी रिपोर्ट देतो, तुम्ही गातेगावला पोलिसाकडे तक्रार करा. ते दवाखान्यात नेऊन चिरफाड करून कोणी मारले तपास करतील.”

माझ्या आईला कोणाचा आधार नव्हता. गातेगाव २५ किलोमीटरच्या आसपास अंतर व तेथून लातूर १५ किलोमीटरच्या आसपास, सोबत आधाराला कोणी नाही. एवढे करून न्याय मिळेल का ? काय न्याय मिळेल? तपास करून कोणाला पकडून नेल्याने आपला माणूस परत मिळणार का? मुलाबाळांचे काय? त्यांना कोण पाहणार ? असे अनेक प्रश्न पडले होते. आभाळच कोसळले होते. जेथे हात पोचत नाहीत तेथे ठिगळ कसे आणि किती लावणार? बराच वेळ आई विचार करीत होती. अनेक विचार येत होते. भयाण वादळात ते विचार मुळासकट उन्मळून पडत होते. कांहीच स्थिर नव्हते. कोण काय बोलत आहे याकडे आईचे लक्ष नव्हते. तिने निर्णय घेतला प्रेत गावी घेऊन जायचे. तक्रार करायची नाही. तो निर्णय पोलीस पाटील यांना सांगितला. त्यांनी एक बाज दिली त्यावर पोलीस पाटलांनी व जगन्नाथ यांनी प्रेत ठेवले. त्या गावातील एकही माणूस उचलायला तयार नव्हता. शेवटी पोलीसपाटलाने गावात जाऊन चार महार बोलावून आणले. त्या चार लोकानी प्रेत उचलले व भोसा यागावी निघाले.

दुपारी घरी आले. वडिलांना भिंतीला टेकून बसवले. माझी आई रडत होती. तिला माझी चुलती समजावत होती. भाऊ बहिणी रडत होते. मला कांहीच

कळत नव्हते पण ते रडतात पाहून मलाही रडू आले होते. काय होत आहे कळत नव्हते. माणसे जमायला सुरवात झाली होती. गावाला जत्रेचे स्वरूप आले होते. का येत होते लोक ? प्रत्येकजण वडिलांचे पाया पडत होता पैसे टाकत होता. हे मला नवीन नव्हते, नेहमीच लोक वडिलांचे पाया पडत असत व दक्षिणा देत असत. पण आज वडील दक्षिणा हातात घेत नव्हते, आशीर्वाद देत नव्हते हाच काय तो फरक होता. पैसे एवढे जमले की वजन केले असते तर साधारण दहा किलो तरी नक्कीच झाले असते. मी बाहेर पडलो परसात जाऊन पाहतो तर तेथे लोक आड खोदत होते. का खोदत होते, अगोदरच एक आड होता आमचा, त्याला खूप पाणी होते. सगळे गाव आमच्या आडाचे पाणी रोजचे रोज पिण्यासाठी घेऊन जात असत. मग आज का खोदतात दुसरा आड ? त्या माझ्या प्रश्नाला उत्तर नव्हते ? कोणीही मला उतर दिले नव्हते.

मी इकडून तिकडे फिरत होतो मला कोणीच बोलत नव्हते. माझी बहीण कमल, तिला आम्ही कबई म्हणत होतो. कबई आली मला घेऊन वडिलांच्या जवळ घेऊन गेली व म्हणाली बघून घे दादांना. दादा निघालेत, पुन्हा येणार नाहीत. मी बघत होतो, वडील बाहेर निघाले की आम्ही त्यांच्या पाया पडत असू त्याच प्रमाणे मी पाया पडलो. पण त्यांनी मलाही आशीर्वाद दिला नाही. नेहमीप्रमाणे मला उचलूनही घेतले नाही. मी विचार करीत उभा होतो. वडिलांना तीन चार जणांनी उचलले. आज दादा घोड्यावर बसले नाहीत. काय होतय त्यांना? त्यांना बरे नाही का? मला बरे नसले की दादा मला उचलून नेतात. निर्वशी काकाकडून ओषध घेऊन येत. दादानांही ओषध आणायचे का? पण निर्वशी काका तर येथेच उभे आहेत ते का नाही ओषध देत?

मी विचारच करीत होतो. वडिलांना त्या खोदलेल्या आडाजवळ आणले त्यांना आत घेऊन गेले. मीठ टाकून माती टाकायला सुरवात झाली. दादांना तर पुरून टाकतात, कुठे निघालेत दादा? कसे जातील. मला रडू येऊ लागले आईने माझा हात धरून माती टाकायला सांगितले. मी माती टाकली, आम्ही सर्वांनीच

माती टाकली. माझे कोडे सुटले नव्हते. मला वाटे जमिनीखालून वाट असेल दादा दुसऱ्या गावावरून परत येतील, रोज मी वाट पाहत होतो ते आलेच नाहीत. चार दिवसांनी एक माणूस आला व घोडा घेऊन गेला. मी आईला विचारले “आपला घोडा तो माणूस का घेऊन गेला. ” आई कांहीच बोलली नाही. मग कबई म्हणाली “घोडा विकला, आपल्याला पूजा करायला पैसे नाहीत म्हणून विकला. ” मी विचारले “किती पैस्यात?” तिने सांगितले “६५ रुपयाला. ” ६५ रुपये म्हणजे किती हे मला समजले नव्हते.

मी आता शाळेत जाऊ लागलो होतो. वडिलांचे आयुष्य देशकार्यात गेले त्यांना मालमता कमवता आली नाही. पूजा झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी घरात खायला कांही नव्हते. माझी आई स्वातंत्र्यसैनिकाची पत्नी होती तिने कंबर कसली. तिने मोलमजुरी करायचे ठरवले. आईला सुरवातीला कोणी मजुरीला घेईनात. म्हणायचे प्रतिष्ठित माणसाची बायको काय काम करणार ? तिला काम जमेल का? आमच्याकडे कामाला असलेली कडूबाईच्या मदतीने मजुरी मिळू लागली. मजुरी मिळवण्यासाठी कडूबाई काम करण्याची हमी घेत होती. आई मजुरीला घेऊन जात होती.

आईने आम्हा भावंडाना झळ पोचू दिली नाही. मोठी बहीण (कबई) लातूरला शासकीय वसतिगृहात राहून शिक्षण घेऊ लागली. तिला तेथे कपडे, राहणे, खाणे, वह्या, पुस्तके मोफत होते. दुसऱ्या वर्षी कबइने माझा भाऊ अनिरुध्दला नांदेडच्या शासकीय वसतिगृहात पाठवले. मी, माझी लहान बहीण शांता व आई आम्ही तिघेच राहिलो. जसजसे आम्ही मोठे होऊ लागलो तसे आईच्या कष्टाची जाणीव होऊ लागली.

मी व शांता शाळेत गेलो होतो. शाळेजवळच नवीन सडकेचे काम सुरु झाले होते. शाळेतून अचानक मी पहिले तर आई सडकेवर दगड टाकण्याचे काम करीत होती. शाळा ११ वाजता सुटली. आम्ही भावंडे तेथे गेलो दगड टाकायला मदत करू लागलो. आई त्यावेळेस कांहीच बोलली नाही. दुसरे दिवशी मी शाळेत

जायचे नाही, आईला मदत करायची ठरवले. आईला सांगितले मी आज तुझ्याबरोबर येणार. आई खूप रागावली. मी गप्प बसल्याबर ती म्हणाली "आधी शिक्षण मगच कामधंदा, काम तर आयुष्यभर करायचेच असते. तुमच्या वडिलांची इच्छा होती की मुलांना खूप शिकवायचे. पुन्हा हा विषय काढायचा नाही," असे ठणकावले. मला पटत नव्हते पण नाविलाज होता.

सुट्टीच्या दिवशी मात्र आम्ही ऐकायचे नाही ठरवून मदतीला जाऊ लागलो. त्यावर आईने अभ्यास करण्याची अट घातली. आम्हाला आनंद झाला. मी सातवी पास झाल्यानंतर आठवीला वाघोली येथे जाऊ लागलो. साधारण पाच ते सहा किलोमीटर जावे लागे.

साधारण वयाच्या १४ व्या वर्षी मी माझ्या आईबरोबर पुण्यास मोठा भाऊ भरत यास भेटण्यास आलो होतो. पुण्याचा झगमगाट पाहून मी भारावून गेलो होतो. पुण्यात राहायला यायचे हे मनात ठरवले. माझ्या चुलतभावाचा मुलगा मोहन यास पुण्याविषयी सांगितले व दोघांनी पुण्याला येऊन कांहीतरी काम मिळवून पुण्यात राहण्याचे ठरवले. घरचे लोक परवानगी देणार नव्हते. काम करण्याचे वयही नव्हते. परंतु त्यावेळी ते कळत नव्हते. आम्ही दोघांनी घर सोडले. तिकीट पुण्याचे काढले होते पण दौंड पर्यंत आलो. तेथे उतरून इडली खाल्ली. मोहनला ताप आला होता. तो म्हणाला परत जाऊ. परत जायला पैसेही नव्हते. काय होईल ते बघू म्हणून शेवटी रेल्वेत बसलो. ती जलद गाडी होती पहिल्यांदाच आशा गाडीत बसलो होतो. कुर्डूवाडी स्टेशनला उतरलो टीसी वर जाण्याच्या जिन्यावर थांबला होता. आम्ही थोडावेळ तेथेच थांबलो. तो गेल्यावर लगेच लातूरला जाणाऱ्या रेल्वेत बसलो. मुरूडला उतरून घरी गेलो. आईने चांगलेच झोडपून काढले. पुन्हा असे करणार नाही म्हणून सुटका करून घेतली.

यानंतर नियमित शाळेत जाऊ लागलो. इयत्ता दहावीत प्रवेश घेतल्यावर मुख्याध्यापकांनी नोटीस काढली की दहावीच्या विद्यार्थ्यांनी रात्री शाळेत झोपायला यायचे. रोज एक शिक्षक सोबत असेल तो अभ्यास घेईल. सर्व मुले तयार झाली. अंथरायला शाळेची सतरंजी होती. पण पांघरायला चादर आवश्यक होती. आमच्या घरी तर गोधड्या अंथरणे गोधडीच पांघरणे अशी परिस्थिती होती. गोधड्याही फाटलेल्या. काय करावे सुचत नव्हते. मी दोन दिवस शाळेत गेलो नाही. तिसऱ्या दिवसी मुख्याध्यापकांनी बोलावणे पाठवले व विचारले "रात्री शाळेत का येत नाहीस. " मला सांगायला कांहीच ठोस कारण नव्हते. "पोट दुखत होते उद्यापासून येतो" असे सांगून निघणार तोच मुख्याध्यापक गरजले. "मला सर्व समजते. आज तू घरी जायचे नाही. आज माझ्या घरी जेव व शाळेत थांब तुझ्या घरी मी नववीतल्या मुलांकडे निरोप पाठवतो." मी कांहीच बोललो नाही. कारण मुख्याध्यापकांना आम्ही खूप घाबरायचो. त्यांच्या घरी मी जेवण करून पुन्हा शिपायाबरोबर शाळेत आलो. दुसरे दिवशी सकाळीच शाळेतून पळ काढला. घरी आलो. आईला निरोप मिळालेला होता. तिने विचारले "तू उद्या येणार होतास आजच कसा आलास?" मी सांगितले "पुढच्या आठवड्यापासून पासून रोज रात्री शाळेत राहायला जायचे आहे. "

दुसरे दिवशी मी घरातून शाळेत जाण्यासाठी बाहेर पडलो. पण शाळेत गेलो नाही. मी थेट लालासाहेब खोसे यांचे शेतात गेलो. त्यांच्या विहिरीचा गाळ उपसण्याचे काम चालू होते. मी त्यांना कामावर घेण्याची विनवणी केली त्याने सांगितले "काम पुरुषाचे पण बाईच्या रोजगारावर काम करावे लागेल." मला गरज होती. रोज दोन रुपये मिळणार होते. मी हो म्हणून तेथेच थांबलो. थोड्या वेळाने कामगार आले कामाला सुरवात झाली. दिवसभर काम केले सायंकाळी सुट्टी झाली. कामगार निघून गेले. माझे कपडे चिखलाने घाण झाले होते. माझेकडे दुसरे कपडे नव्हते. मी त्यावेळी अंडरवेअर वापरत नव्हतो. घरीच स्वत:च शिवलेला लंगोट

वापरत होतो. मी कपडे पाण्यात धुतले. लंगोटवर घरी जाणे शक्य नव्हते. कपडे हवेत झटकून थोडेसे वाळवले. घरी जाईपर्यंत थोडेसेच ओले राहिले. घरी कोणालाही कळले नाही पुढे असाच उपक्रम दहा दिवस चालू होता. कोणालाच संशय ही आला नाही.

मग मी पगार घेतला, एकूण बावीस रुपये मिळाले. मी नेहमीप्रमाणे शाळेत म्हणून मुरूडला बाजारात गेलो. तेथे कपड्याचे दुकाने होती पण घ्यायचे कसे याचा अनुभव नव्हता. घासाघीस कशी करायची? दुकानदार माझे ऐकेल का? चादरीची किती किंमत असेल? विचार करीतच एका दुकानासमोर थांबलो. बऱ्याच वेळाने एकजण आला व त्याने सोलापुरी चादर पाहिली किंमत विचारली दुकानदाराने अठरा रुपये सांगितले. त्या माणसाने चौदा रुपयात मागितली. दुकानदाराने शेवटी सोळा रुपये लावतो घ्यायची तर घ्या नाहीतर ठेवून देतो असे म्हणाला तो माणूस पंधराच्या वर नाही म्हणाला व उठून गेला. मी लगेच दुकानदाराला म्हणालो मला ती चादर द्या मी सोळा रुपये देतो. त्याने लगेच चादर दिली, मी पैसे दिले. पहिली खरेदी झाली होती. आत्मविश्वास आला. मग रेडीमेड कपडेवाल्याकडे गेलो, अंडरवेअर टॉवेल घेतला. घरी आलो आईला सांगितले, मुख्याध्यापकांनी हे सर्व मला दिले आहे.

दुसरे दिवशी चादर घेऊन शाळेत गेलो. मुख्याध्यापकांनी शाळेत न येण्याचे कारण विचारले प्रथम मी गोंधळलो. नंतर सांगितले “पोटात दुखत होते. ” मी खोटे बोलत असल्याचे त्यांनी ओळखले होते त्यांनी मला एका हातावर तीन दुसऱ्या हातावर तीन छड्या मारल्या मी रडतच वर्गात पळालो. जेमतेम एक महिना झाला असेल तोच आमच्या इंग्रजीच्या शिक्षकांनी ट्रक चालवताना अपघात केला. त्यात एक माणूस मृत्युमुखी पडला होता. ते शिक्षक शाळा करून ट्रक चालवत होते. त्यांना पोलिसांनी पकडून नेले. वर्षभर शाळेला इंग्रजी साठी शिक्षक मिळाला नाही. मुख्याध्यापक शिकवण्याचा प्रयत्न करीत होते पण त्यांना तितकेसे जमले नाही.

एके दिवसी माझा भाऊ अनिरुद्ध मुंबईहून आला त्याने एक कॅमेरा आणला होता. मी फोटो काढण्याचा धंदा सुरु केला. भरपूर पैसे मिळत होते. मी पंधरा किलोमीटर चालत जाऊन रेल्वेने लातूरला फोटो डेव्हलपमेंट करण्यास जात असे. एके दिवशी फोटो डेव्हलपमेंट करायला उशीर झाला. रेल्वे निघून गेली म्हणून रेल्वे स्टेशनमधेच झोपलो. रात्री चोरांनी माझी फोटोची पिशवी चोरून नेली. त्यात लोकांचे फोटो, निगेटीव्हच व एक रोल होता. पैसे खिश्यात असल्याने चोराला फार फायदा झाला नाही. पण माझे खूप नुकसान झाले होते. लोकांचे पैसे परत द्यावे लागले.

परीक्षा जवळ आली होती. प्रवेश पत्रावर फोटो लावायचे होते. मी सर्व विद्यार्थ्यांचे फोटो काढावयाचे ठरवले परीक्षेच्या अगोदर दोन दिवस मी माटेफळ, मसला, वाघोली या गावी फिरत होतो. फोटो काढले. रात्रीच मुरूडला गेलो. जनता विद्यालयात राहण्याची सोय करण्यात आली होती. मी फोटो स्टुडीओ गाठला व रोल डेव्हलपमेंट साठी दिला. त्याने जादा चार्ज घेऊन फोटो दिले. मुख्याध्यापक शिक्का घेऊनच आलेले होते. मी विद्यार्थ्यांचे फोटो प्रवेश पत्रावर चिटकवले. शिक्के मारून प्रवेश पत्र वाटप केले. अभ्यासाकडे लक्ष द्यायला वेळ नव्हता. इंग्रजीचा अभ्यास तर कोणाचाच झाला नव्हता. शेवटी व्हायचे तेच झाले शाळेचा निकाल झिरो टक्के लागला. आम्ही सर्व विद्यार्थी नापास झालो होतो.

घरी न सांगता मी पुण्याला जायचे ठरवले. सकाळीच घराबाहेर पडलो. माझा मित्र बिभीषण खोसे याला भेटलो. दुपारी १२ वाजल्यानंतर माझे घरी निरोप देण्यास सांगितले. कारण दुपारी १२ वाजता मुरुडहून रेल्वे सुटणार होती. आई माझेपर्यंत पोचू शकणार नव्हती. मी रेल्वेने कुर्डुवाडीला आलो. पुण्याकडे जाणाऱ्या पॅसेजंर गाडीची चौकशी केली. रात्री १२ नंतर येणार असल्याचे समजले.

आई येणार तर नाही ना याची मला खूप भीती वाटत होती. शेवटी पॅसेजंर गाडी आली मी गर्दीत घुसलो. बसायला जागा मिळणे शक्य नव्हते. मग मी बाकड्याखाली जाऊन झोपलो.

सकाळचे सात वाजले असावेत. स्वच्छ सूर्यप्रकाश पडला होता. लोकांची गडबड सुरु झाली होती. मी डोळे चोळत उठलो. झोप पूर्ण झाली नव्हती. उठावेसे वाटत नव्हते. घरी असतो तर आणखी लोळत पडलो असतो. लोकांच्या गोंगाटामुळे ते शक्य नव्हते. मी खिडकीजवळ बसलेल्या माणसाला विचारले कोणते स्टेशन आले. त्याने पुणे आल्याचे सांगितल्यावर मी लगेच उठलो. मी डोक्याखाली माझी कपड्याची पिशवी ठेवली होती. ती शोधू लागलो पिशवी सापडत नव्हती. शोधाशोध करूनही पिशवी सापडली नाही. कोणीतरी चोरली होती. त्या पिशवीत चादर, शर्ट पायजमा, अंडरवेअर एवढेच होते. खिसा चापचून पहिला दोन रुपये पन्नास पैसे व तिकीट होते. रेल्वेतून उतरलो, तिकीट टीसीला देऊन बाहेर पडलो.

४ नंबरच्या बसने कॅनॉल स्टॉपवर उतरायचे होते. पुणे स्टेशन ते कॅनॉल पायी चालत जायचे ठरवले. हातगाड्यावर भजी खाल्ली. पाणी पिऊन बसस्टॉपवर गेलो. रस्त्यावरील बस स्टॉपवर बसचे नंबर लिहिलेले होते. ते नंबर पाहत मी चालू लागलो. ४ नंबर बोर्डावर दिसला की मला आनंद होई. पुढे ४ नंबर दिसेना अनेक बस नंबर दिसत होते बस दिसत होत्या. माझा रस्ता चुकला होता. काय करावे सुचत नव्हते. रस्त्यात कोणालाही विचारायचे नाही. असे ठरवले होते. याचे कारण म्हणजे पुण्यात भामटे असतात, ते फसवतात व खोटे सांगून लुटतात असे ऐकले होते. कांही झाले तरी कोणालाही विचारायचे नाही असे मनाशी ठरवून चालत राहिलो.

अचानक मला समोर शनिवार वाडा दिसला. मी इतिहासात वाचले होते. आत कसा आहे ते पहाता येते का असा विचार करीत मुख्य दरवाज्याजवळ आलो. लोक जात येत होते. मीही घाबरत घाबरत आत गेलो. सगळीकडे पाहून झाल्यावर मी बाहेर पडलो. मला गुलटेकडीला जायचे होते पण जाणार कसा ? मोठा प्रश्न

पडला होता. तेवढ्यात एक शाळेचा ड्रेस घातलेला मुलगा दिसला. माझ्यापेक्षा दोन वर्षांनी लहान असावा. मी विचार केला शाळेचा मुलगा आहे म्हणजे भामटा नाही. मी त्याला विचारले की गुलटेकडी ला कसे जायचे त्याने सांगितले “येथून स्वारगेटला बसने जा, तेथून जवळच गुलटेकडी आहे. ”

त्यास म्हटले “मला पायीच जायचे आहे. पायी जाण्याचा रस्ता सांग. ” त्यावर तो म्हणाला “खूप लांब आहे या रस्त्याने सरळ जायचे. बाहुली हौदापासून दोन रस्ते आहेत डाव्या बाजूने जा. पुढे एसटी स्टँड दिसेल तेथे कोणालातरी विचार तेथून जवळच आहे. ”

“बरे झाले तू देवासारखा भेटलास, मी रस्ता चुकलो होतो. ” असे म्हणून मी निघालो. मला कोणी फसवले नाही याचा मला आनंद झाला. मी चालत स्वारगेटला गेलो. तेथे एका कंडक्टरला विचारले. त्याने रस्ता सांगितला. द व्हाईट क्लाऊड पेपर मिल सापडली. वाचमनला सांगितले की भरतला भेटायचे आहे. तो आत जाऊन आला. थोड्याच वेळात सुट्टी होईल असे सांगितले.

एक तासाने भरत आला मला खूप आनंद झाला पण त्याला आनंद झालेला दिसला नाही. त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या होत्या. त्याने मला सायकलवर बसवले. एका बागेत आणून सोडले. तेथेच बसायला सांगून तो निघून गेला. भूक लागली होती पण मी तेथून कोठेही गेलो नाही. अंधार पडायला लागला होता आबा अजून आला नव्हता. भरतला मी आबा म्हणत असे.

आबा आला आम्ही चालत महात्मा फुले मंडईत आलो. त्याने तेथे कांदापोहे घेतले. त्याने विचारले का आलास मी सर्व हकीकत सांगितली त्यावर तो खूप चिडला. त्याने परत जा म्हणून सांगितले. मी काम करण्यासाठी आलो असल्याचे व परत जाणार नाही असे सांगितले. त्याने सागितले “आमच्या मिलमध्ये भरती नाही. हॉटेलमध्ये काम करशील का?”

मी म्हणालो “कामाची मला लाज वाटत नाही कसलेही काम करण्याची माझी तयारी आहे. ” तेथून जवळच बॉम्बे विहार नावाचे हॉटेल होते, तेथे कामास लावले. त्यांनी उद्या सकाळी आठ वाजता येण्यास सांगितले. आम्ही दोघे नानापेठ येथील विठ्ठलरुख्मिनी मंदिरात गेलो, तेथे आबाची ओळख होती. पुजाऱ्याने चटई दिली. आबाने माझी ओळख करून दिली. माझी झोपायची सोय केली. सकाळी आठ वाजता कामावर गेलो. दिवसभर काम केले. दुपारी जेवण केले. संध्याकाळी आठ वाजता पुन्हा जेवण करून निघालो. ठरल्याप्रमाणे आबा अगोदरच येऊन थांबला होता. मी दिवस चांगला गेल्याचे सांगितले. सकाळी उठलो पण पोटात गडबड झाली होती. कालचे जेवण पचले नव्हते. तसाच कामावर गेलो. थोड्या वेळाने मला उलटी होत असल्याचे जाणवले मी पळतच बाहेर गेलो. मी का पळालो म्हणून बाकी कामगार ही मागे धावले. मला उलटी झालेली पाहताच सर्वजण परत गेले. मालकाने सांगितले तब्बेत ठीक झाल्यावर कामावर ये. माझे काम सुटले होते. मला खूप वाईट वाटले.

सिटीपोस्टाच्या पायरीवर बसून दिवस काढला. रात्री त्या देवळात आलो. आबा आला त्या सर्व हकीकत सांगितली, तो खूप रागावला. मी कांहीच बोललो नाही. आम्ही अनेक ठिकाणी कामाची चौकशी केली. काम मिळत नव्हते. मंडईत जाऊन झुणकाभाकर केंद्रावर पोहे खाल्ले. तेथून फुलवाले चौकात नवयुग हॉटेल मध्ये विचारले असता त्याने सांगितले की जेवण, राहणे सह ३० रुपये महीना मिळेल. आठवड्याला एक सुट्टी असेल पण त्याचा एक रुपया रोख मिळेल, सुट्टी मिळणार नाही. रोज १२ तास काम करावे लागेल. मी सर्व कबुल केले.

मालकाने आम्हास जेवण दिले. आबा निघून गेला, मी तेथेच राहिलो. रात्री १२ वाजता हॉटेल बंद झाले. सर्वानी आपापल्या चटई काढल्या ,माझ्याकडे कांहीच नव्हते. एका कामगाराने चटई व चादर दिली. मी झोपलो. सकाळी ४ वाजता कांहीजण उठले, तयारी सुरु झाली. कांहीजण ६ वाजता उठले. मी जागा असूनही उठलो नव्हतो. राकेश नावाचा एका मुलाने मला ७ वाजता उठवले व

म्हणाला ८ वाजता तुला कामावर जायचे आहे. आंघोळ वगैरे करून घे. माझ्याकडे कपडे नसल्याचे सांगितल्यावर त्याने स्वत:ची अंडरवेअर, शर्ट, पँट दिली. आंघोळीला गेलो तेथे मोठा गोटा साबण होता. मी माझे कपडे धुतले. आंघोळ केली. कामाला सुरवात केली.

एक महिना होत आला होता. १ तारीख होती सर्वांचा पगार होणार होता. सायंकाळी आबा आला. मालकाने त्याला नाश्ता देण्यास सांगितले. त्याने मालकास माझा पगार मागितला मालकाने मला विचारले, मी होकार दिला. तो पैसे घेऊन निघून गेला. मला कपडे घ्यायचे होते. मी विसरून गेलो होतो. मी राकेशला माझी अडचण सांगितली. तो म्हणाला “ते कपडे तुलाच दिलेले आहेत. परत करू नकोस. ” मी म्हणालो “माझे पहिले कपडे खेड्यातील लोकांसारखे असल्याने लोक लगेच खेड्यातील असल्याचे ओळखतात म्हणून मला आणखी शर्ट पँट घ्यायचे होते. ” त्यावर त्याने सांगितले की खालच्या चौकात जुने कपडे खूप स्वस्तात मिळतात मी तेथूनच घेतो.

माझ्याकडे सुट्टीचे पैसे साठले होते. आम्ही दोघे त्या चौकात गेलो व कपडे खरेदी केले. माझी अडचण संपली होती. एक महिना संपला एक तारखेला आबा आला त्याने पगार घेतला. मी त्यास म्हणालो २० रुपये आईला पाठवायचे आहेत. तो म्हणाला १०० रुपये झाले की पाठवू. मी ठीक म्हणालो तीन महिने तो पगार घेतच राहिला. पैसे दिले नाहीत. एके दिवसी हॉटेल मधील मोरीवाला गावी गेला. मला त्याचे काम देण्यात आले. तो मोरीवाला रात्री मालकाची मालीश करीत होता, त्याला त्याचे वेगळे पैसे मिळत होते. रात्री मालकाने मला सांगितले की हॉटेल बंद झाल्यावर मालीश कर. मी नकार दिला त्यावर त्याने वेगळे पैसे देईन असे म्हणाला मी स्पष्ट नकार दिला. त्याने मला जोरात थप्पड मारली मी जमिनीवर कोसळलो. कानात शिट्टी वाजल्या सारखे वाटत होते. आचारी मध्ये पडला त्याने मला आत नेले व झोपायला सांगितले. मी सकाळी उठलो ते काम करायचे नाही म्हणूनच. आंघोळ केली. कपडे टॉवेल मध्ये बांधले.

तोच मालकाने बोलावले व म्हणाला तुला कामावरून काढून टाकले आहे. मला काम सोडून जायचेच होते, मी कपडे घेऊन निघालो. गुलटेकडीला गेलो, आबाला हकीकत सांगितली. संध्याकाळी आम्ही दोघे हॉटेलवर आलो. आबाने पगाराचा हिशोब मागितला. मालकाने लगेच पैसे देऊन टाकले. मला मारल्याबद्दल त्याने कांहीच विचारले नाही. मलाच गप्प बसण्यास सांगितले.

आम्ही एके ठिकाणी पुरीभाजी खाल्ली व रात्री नानापेठेतील देवळात झोपायला गेलो. सकाळी आबाने सांगितले की दुपारी मी येतो येथेच थांब. दुपारी ४ वाजता परत आला.

आम्ही निघालो एक बोर्ड दिसला "इंदिरा कम्युनिटी किचन" ५५८ रास्तापेठ. आत ऑफिसमध्ये गेल्यावर आबाने चेअरमन साहेबांना सांगितले की हा माझा लहान भाऊ आहे, त्याला कामाची गरज आहे. साहेबांनी नाव, शिक्षण, गाव इत्यादी किरकोळ प्रश्न विचारले व सांगितले "जेवणाची राहण्याची सोय व ९० रुपये महिना देऊ." मला खूप आनंद झाला.

पुढे साहेब म्हणाले "उद्या स्वच्छ कपडे घालून ये. " दुसरे दिवसी कामावर हजर झालो. चेअरमनसाहेबांनी मला आत नेले व तेथील खंडोबा नावाचे आचारी यांची ओळख करून दिली व म्हणाले यांना दिवसभर जी मदत लागेल ती त्यांना करायची. खंडोबा आचारी भाजी बनवत असत.

मी काम सुरु केले. या किचनमध्ये अनेक प्रकारची मिठाई बनवली जात होती. त्याचे वेगवेगळे आचारी होते. मोठ्या हॉल मध्ये किमान दोनशे तरी महिला काम करीत होत्या. कांहीजणी चपात्या करत तर कांहीजणी भाकरी करत. इतर कांही महिला भांडी घासत. इतक्या महिला एकत्र असून कधीही त्यांचा आवाज नव्हता. आवाज होता तो रॉकेलच्या स्टोहचा. भाजी चिरून द्यायला, बटाटे सोलायला महिला होत्या.

तसे मला फार काम नव्हते. वेळेचे बंधन नव्हते. खूप आनंदात होतो. एक तारखेला आबा येत होता. माझा पगार घेऊन जात होता. मला किचनचे दोन कपडेचे जोड मिळाले होते.

मला परीक्षेला बसायचे होते. मी रजा काढून गावी गेलो. परीक्षेचा फॉर्म भरण्याची मुदत संपली होती. सावत्र भावाने शेती विकण्याचे ठरवले होते. सर्व शेती स्वत:चे नावे करून घेतली होती. त्यामुळे मी गावीच राहायचे ठरवले. मजुरी करायची म्हणून गावातील सोपान खोसे यांचे शेतीत काठी काढण्यास गेलो काठी म्हणजे दोन हात रुंद पाच हात लांब एक हात खोल जमीन खोदायची व बांध ठीक करायचा. मी तीन दिवसात दोन काठ्या काढल्या. संध्याकाळी ६ रुपये मिळतील असे वाटले पण मिळाले नाहीत. त्यांनी रविवारी देईन असे सांगितले. रविवारी मागितले तर ते एकदम भडकले व म्हणाले “मी पळून चाललो का? पैसे आले की देईन. ” शेवटपर्यंत पैसे मिळालेच नाहीत. नंतर दगडू जाधव यांचे विहिरीवर कामास गेलो. एक आठवडा काम केले, तेथे पैसे मिळाले. तेथील काम संपल्यावर माझा पुतण्या मोहन व मित्र बिभीषण तिघे जायफळला कामास गेलो. एका विहिरीवर काम मिळाले. एक आठवडा काम केले. पैस्यासाठी तीन वेळा जावे लागले.

रोजगाराचे कांही खरे नाही म्हणून मी पुन्हा पुण्यास आलो. इंदिरा कम्युनिटी किचनमध्ये गेलो, त्यांनी जागा भरली होती. मला त्यांनी नकार दिला. मग मी आबाकडे पेपर मिलमध्ये गेलो. तेथे समजले तो मिल सोडून गेला होता.

मी मुंबईला जायचे ठरवले. मुंबईत माझा भाऊ अनिरुद्ध राहत होता. त्याला मी बापू म्हणत होतो. त्याच्याकडे जायचे म्हणून मुंबईला गेलो. बाबुलनाथ जवळ सीताराम भाजीवाला कोठे आहे विचारल्यावर एका भाजीवाल्याने दोन दिवसापासून आला नाही असे सांगितले. मला खूप काळजी वाटत होती काय करावे सुचत नव्हते. सीताराम कधी येईल हे त्यांना सांगता येत नव्हते. मला आठवले, ठाणे येथे माझा शाळेतील मित्र शहाजी नरसिंगे राहत होता. तो रेनबो टेक्स्टाईल

मध्ये काम करीत असल्याचे त्याने एकदा मला सांगितले होते. त्याचा पत्ता लिहून मी एक चिट्ठी त्या भाजीवाल्याकडे दिली. सीताराम आला की त्याला द्या असे सांगितले. सीताराम म्हणजे अनिरुद्ध त्याचे हे टोपणनाव.

ठाण्याला मित्राकडे जायचे ठरवले. पैसे मोजकेच होते. मी ठाणे जाणारी लोकल पाहून बसलो. लोकलमध्ये चढताना माझी एक चप्पल खाली पडली. लोकल सुरु झाली होती. मग दुसरीही चप्पल फेकून दिली. ठाणे स्टेशनवर उतरून चौकशी केली असता ती मिल खूप दूर असल्याचे समजले. मी चालत जायचे ठरवले. रस्त्यावरील डांबर खूप तापलेले होते. पायाला चटके बसत होते. रस्त्याच्याकडेने चालू लागलो. एक ट्रक थांबला होता त्याच्या ड्रायव्हरला विचारले “रेनबो टेक्स्टाईल किती लांब आहे?” त्यावर तो म्हणाला “खूप लांब आहे, पायी जाणार आहेस का?” मी हो म्हटल्यावर त्याने माझ्या पायाकडे पाहिले. त्याने विचारले पायात चप्पल नाही. उन किती आहे तू कसा जाणार? त्याला सर्व हकीकत सांगितली. तो म्हणाला थोडावेळ थांब मी तुला सोडतो. रस्त्यावरच ती मिल आहे.

दहा मिनिटांनी क्लीनर आला. मी त्यांच्याबरोबर ट्रकमध्ये बसलो. त्याने मिल जवळ सोडले. मिलमध्ये चौकशी केली असता त्यांनी शहाजी समोरच्या झोपडपट्टीत राहतो असे सांगितले. पत्ता लगेच सापडला. शहाजीची भेट झाली. त्याने संध्याकाळी मी येण्याचे कारण विचारले. मी काम शोधण्यास आलो आहे. मला तुझ्या मिल मध्ये कामाला लाव असे म्हटल्यावर त्याने मिलमध्ये भरती नसल्याचे सांगितले.

आमच्या गावातील संतु सुताराचा मेव्हणा श्रावण महालक्ष्मी येथे राहतो. त्याच्याकडे चौकशी करू म्हणून आम्ही दुसरे दिवसी त्याला भेटलो. त्यानेही भरती नसल्याचे सांगितले. पुन्हा ठाणे येथे गेलो.

संध्याकाळी अनिरुद्ध उर्फ सीताराम पत्ता शोधत आला. मला बरे वाटले. सकाळी उठल्यावर आम्ही नरसिंगेचा निरोप घेतला. ठाणे स्टेशनवर आल्यावर

प्रथम चप्पल घेतली. त्या दिवसी त्याने राणीचा बाग दाखवला. नंतर गेटवे ऑफ इंडिया ,चौपाटी दाखवली. संध्याकाळी त्याचा मित्राकडे राहिलो दुसरे दिवसी हंगिग गार्डन, म्हातारीचा बूट, महालक्ष्मी, हाजीअली बघून आलो.

संध्याकाळी नागपाडा येथे आलो. मला एका हातगाडीवर बसवून तो त्याच्या मालकाकडे जाऊन आला. मला म्हणाला “उद्या लवकर उठायचे. लवकर झोप. आम्ही त्या हातगाडीवर झोपलो. पहाटे ४ वाजता उठून त्याने त्या गाड्यावर केळी भरली. तो गाडा ढकलत आम्ही निघालो. ग्रांट रोड, नानाचौक, बाबुलनाथ मार्गे वाळकेश्वर येथे पोहचलो. केळी विकण्यास सुरवात केली. नाश्ता, जेवण केले संध्याकाळपर्यंत सर्व केळी विकली होती. परत नागपाडा येथे आलो. असा रोज नित्यकर्म होता.

राजभवनात शिपायाच्या जागा भरायच्या आहेत असे समजल्याने मी अर्ज केला त्याला जोडून शाळेचा दाखला दिला. नोकरी मिळाली नाहीच परंतु दाखलाही गहाळ झाला. परत मिळाला नाही.

एके दिवशी माझे पोटात दुखू लागले मी दुर्लक्ष केले. रात्री खुपच त्रास होऊ लागल्यावर बापूला उठवले. त्यास पोटात दुखत असल्याचे सांगितले. त्याने टॉयलेटला जाण्यास सांगितले. मी जाऊन आलो पण कांहीच फरक पडला नव्हता. मी बसून राहिलो. पहाट होताच सर्वजण उठून केळी भरू लागले आम्हीही केळी भरली. गाडा ढकलत निघालो. वाळकेश्वरला आल्यावर त्याने मला सोडा प्यायला दिला. थोडे बरे वाटले. पुन्हा दुखायला सुरवात झाली. थोड्यावेळाने दुसरा सोडा पुन्हा तिसरा सोडा कांहीही फरक पडत नव्हता. चार दिवस झाले पोटात दुखायचे थांबत नव्हते. नागपाडा येथून निघून बाबुलनाथपर्यंत आलो मला चालवेना. मी बापूस म्हटले मी येथेच थांबतो. बरे वाटले की वाळकेश्वरला येतो. बापू निघून गेला. मला बसता येईना. कठड्यावर झोपलो झोपताही येईना. खूप त्रास होत होता. एका नळावर गेलो, चूळ भरली तर तोंडातून पिवळे पाणी पडले. तोंडावरून हात

फिरवला चेहरा बधीर झाला होता. हात पाय धुताना हातपाय सुजल्याचे दिसले. डोळे रुमालाने पुसले तर रुमाल पिवळा झाला होता. मी बसत बसत वाळकेश्वर गेलो, बापू दिसला. त्याला सर्व हकीकत सांगितली. त्याने जवळच्या झाडाखाली झोपायला सांगितले. त्याने सोडा प्यायला दिला. मी लघवीस गेलो तर लघवी गडद पिवळी होती.

मी गाड्याजवळ येऊन बसलो. लोक माझ्याकडे विचित्र नजरेने पाहत होते. एकाने विचारले काय झाले मी पोट दुखत असल्याचे सांगितल्यावर तो म्हणाला तुला कामीन झाली आहे. संध्याकाळी महमद केळेवाला भेटला, त्यानेही तेच सांगितले. तो बापूला बाजूला घेऊन म्हणाला “इसे कामीन हुई है, जल्दीसे जल्दी इसे मुलुख भेज दो, ये दो चार दिन का मेहमान है. दवाखानेमे कोई इलाज नही है. ”

हे मी एकले होते. मी खूप घाबरलो होतो. मी बापूस विचारले “महमद काय म्हणाला?” त्यावर बापू म्हणाला “तो वेडा आहे. त्याला काय कळते? मी तुला उद्या दवाखान्यात घेऊन जातो.” दुसरे दिवशी मी कसे तरी त्याच्याबरोबर निघालो. व्हाईट हाउस जवळच्या हॉटेल जवळ आलो. तेथे त्याने मला थांबायला सांगितले. हॉटेल मालक बापूच्या ओळखीचा होता. त्याने मला पाहताच म्हणाला “इसे दवापानी करो ये जादा दिन नही रहेगा, केला बेचना छोड दो पहले इसे दवापानी करो. ” बापू म्हणाला “थोडी देर में आता हुं. तबतक खयाल रखना. ” बापू मला सोडून गेला तो परत आलाच नाही. संध्याकाळ झाली मी हळूहळू बसत बसत वाळकेश्वरला गेलो. बापू तेथे नव्हता. परत तीन बत्ती येथे जाऊन महमदकडे चौकशी केली तर तो म्हणाला “ सीताराम तो चला गया, अब तो नागपाडा पहुंचा होगा. ” इतके लांब अंतर मला चालणे शक्य नव्हते. मी रडू लागलो तेंव्हा महमद म्हणाला “तू फिक्र मत कर मै पहुंचा देता हुं. ”

थोड्या वेळाने इक्बाल केळेवाला आला. त्याला महमद ने मला नागपाड्यात सोडायला सांगितले त्याने मला गाड्यावर झोपवले. गाडा ढकलत

नागपाड्यात आलो. गाडा जमा करून बापू तेथून निघून गेला होता. इक्बाल म्हणाला “आजसे मै तुम्हारा दुसरा भाई, मै संभालुंगा तुझे. ”

दुसरे दिवशी इक्बाल ने गाडीखाली जागा केली त्यावर मला झोपवले. वर केळी भरली व गाडा ढकलत निघाला. संध्याकाळी महमद कडे आलो. त्यास हकीकत सांगितली तो म्हणाला “पहले इसको बचाना है. मै जाके आता हुं. ”

महमद कोणालातरी घेऊन आला. त्याने मला पहिले व म्हणाला “याला जास्त झाले आहे, औषध काम करणार नाही. ”

महमद म्हणाला “ आप दवा दिजीये, जिंदगी और मौत अल्लाके हात में है. ” त्याने एक केळी घेतली बाजूला जाऊन त्यात औषध भरले व मला खायला दिली. तीन दिवस औषध घेतले थोडा फरक पडला होता.

त्या माणसाने एका धोब्याचा पत्ता दिला. त्याच्याकडून औषध घेण्यास सांगितले. लगेच इक्बालने गाडा ढकलत त्या पत्त्यावर नेले. धोब्याने सकाळी काचेची मोठी बाटली घेऊन यायला सांगितले. सकाळी त्याने औषध दिले झाडपाला होता. दिवसातून तीन वेळा ते झाडपाल्याचे पाणी प्यायचे होते तिखट तेलकट पिवळे पदार्थ काही खायचे नाही. असे सांगण्यात आले. सात दिवस मी औषध घेतले. या दरम्यान फक्त इडली चटणी व पाव खात होतो.

सातव्या दिवशी मी पूर्ण बरा झालो होतो. इक्बाल बरोबर त्या धोब्याकडे गेलो. इक्बालने त्यास किती पैसे द्यायचे असे विचारले तो धोबी म्हणाला “मी देवाचे कार्य म्हणूण औषध देतो, पैसे घेत नाही. घ्यायचे असते तर पहिल्याच दिवसी सांगितले असते. ” मग धोब्याने त्यास विचारले इतके जास्त होईपर्यंत तुम्ही का गप्प बसलात ?”

इक्बाल म्हणाला “ये मेरा भाई नही, अल्लाने चाहा और मैने इसे भाई बना दिया.” त्याने पूर्ण हकीकत त्या धोब्यास सांगितली. धोब्याच्याही डोळयातू पाणी आले. “देव तुमचे भले करो. ” असा आशीर्वाद इक्बालला दिला.

आम्ही बाहेर पडलो. इक्बालने त्याच्या मालकाची ओळख करून दिली व एक गाडा माझ्यासाठी घेतला. त्यावर केळी भरून दिली. मी बापू प्रमाणे केळी विकायला सुरवात केली. खर्च सोडून दररोज पाच रुपये मिळत होते. माझ्याकडे २६० रुपये जमा झाले होते. मी गावी जाण्याचा निर्णय घेतला. कपडे खरेदी केले. इक्बाल व महमदचा निरोप घेतला व गावी निघालो.

मुरूडला उतरल्यावर आईसाठी एक साडी घेतली. घरी गेलो. आईला पाहताच मला रडू कोसळले. मी मरणाच्या दारातून परत आलो होतो. आई मला विचारत होती. काय झाले म्हणून. पण मला कांही सांगता येत नव्हते. नंतर सांगतो म्हणून डोळे पुसले. सुटकेस उघडून बहिणीला ड्रेस दिला ती खुश झाली. मग आईला साडी दिली. ही माझ्याकडून आईसाठी पहिलीच साडी होती. आईच्या डोळयातून आनंदाश्रु वाहू लागले. गावात सगळयांना दाखवत होती माझ्या मुलाने घेतली म्हणून. कितीतरी कौतुक करीत होती.

आईने सांगितले की माझ्या मोठ्या बहिणीला पहायला पाहुणे येणार आहेत बरे झाले तू आलास. पंढरपूरचे पाहुणे येणार होते. बहिणीला पत्र पाठवून बोलावून घेतले.

ठरलेला दिवस आला. आम्ही घर स्वच्छ केले. चहा पावडर साखर आणून ठेवली. त्यावेळी आम्ही चहा पीत नव्हतो. कधीतरी पाहुणे आले तरच चहा केला जात असे. गहू दळून आणले. आम्ही त्यावेळी ज्वारी खात होतो. गव्हाच्या चपात्या

किंवा पोळया फक्त सण असेल तेंव्हाच केल्या जात होत्या. आम्ही वाट पहात थांबलो.

सायंकाळी एक संन्याशीबाबा एकटेच आले. मी माझा चुलत भाऊ जगन्नाथ अप्पा यांना बोलावले. तुम्ही एकटेच कसे म्हटल्यावर त्यांनी सांगितले की मुलगा माझा भाचा आहे, तो पुण्याला नोकरीस आहे. त्यांना माझ्याशिवाय जवळचे कोणी नातेवाईक नाहीत. मीच सगळे पाहतो. मुलगी पहावयास त्यांना कधी बोलवता असे विचारल्यावर ते म्हणाले मला मुलगी पसंद आहे. माझ्या शब्दाबाहेर कोणीही नाही, तुम्हीच कुर्डुवाडीला या. तेथे मराठी शाळेजवळ राहतात. भाचा पुढच्या रविवारी येणार आहे मुलीला घेऊन तुम्हीच या. पसंदी झाली की पुढील बोलणी करू. जगन्नाथ अप्पानी इतके लांब जाणे जमणार नाही असे सांगितले. आमच्या घरी पुरुष माणूस म्हणजे मीच होतो. पाहुण्यांना विचारले काय करायचे ते म्हणाले “ मी त्यांचाही पाहुणाच आहे. तुमच्या बाजूने मी येतो. आपण तिघे जाऊ. खूप विचार करून शेवटी कबई, मी व पाहुणे तिघेजण मुरूडला चालत येऊन रेल्वेने कुर्डुवाडीला आलो. त्यांना व आम्हालाही पसंद होते बोलणी नंतर करू असे सांगितले. आम्ही गावी परत आलो. आबास व भाऊ(भागवत) यास पत्र पाठवले, मचकूर कळवला. मी व कबई पुण्यास येत असल्याचे कळवले. ठरल्याप्रमाणे पुण्यास आलो, भाऊकडे गेलो. आबा आलेलाच होता. चहा झाल्यावर मी बाहेर जावून नवरदेव मुलास विद्यापीठात फोन केला. आम्ही पुण्यात आलो आहोत. उद्या सकाळी पांडव नगर येथील शाळेत यावयास सांगितले. घरी आल्यावर विषय काढला. दोघांच्या कपाळावर आठ्या पडल्या.

भरत म्हणाला “आताच ती बी ए झाली आहे, नोकरी करेल, पैसे साठवल्यानंतर लग्न करून देऊ. ” त्यावर भागवत(भाऊ) म्हणाला “भरत म्हणतो ते खरे आहे. लग्न करून देण्याची आपली परिस्थिती नाही. ” मी म्हणालो “पुन्हा हुंडा न मागणारे स्थळ मिळेलच याची खात्री नाही. ” भरत म्हणाला “पुढचेपुढे बघू सध्या लग्नाचा विचार करायचा नाही. त्यांना मी विरोध करण्याचे कारण विचारले असता

भरत म्हणाला “आमच्याकडे लग्न करून द्यायलाही पैसे नाहीत. ” त्यांना रजिस्टर मॅरेज करू म्हटल्यावरही ते तयार होईनात. नवरदेवाकडून कसलीच हरकत नव्हती. शेवटी मी पुढाकार घेऊन रजिस्टर मॅरेज करून दिले.

मला पुण्यात राहायचे म्हटल्यावर काम करणे आवश्यक होते. मी भाऊला शब्द टाकला की तुझ्या संस्थेत कामाला लाव त्याने शक्य नसल्याचे सांगितले. “मग दुसरीकडे कोठेही काम लाव काम कसलेही असले तरी माझी करायची तयारी आहे.” म्हटल्यावर तो म्हणाला प्लंबरच्या हाताखाली काम करशील का असे विचारल्यावर मी हो म्हटले.

त्याने वडारवाडीत एका प्लंबर कडे नेले. त्याने दुसरे दिवशी सकाळी आठ वाजता ग्राहकपेठ जवळ बोलावले. मी सात वाजताच गेलो. दुपारचे बारा वाजले, प्लंबर आला नाही. संध्याकाळी त्यास विचारले असता त्याने दुसरा हेल्पर मिळाल्याचे सांगितले. मी भरतला विचारले असता तो म्हणाला “ताडी डेपोत काम करीत असलास तर उद्या सकाळी चार वाजता निघू. ” मी होकार दिला. ताडी म्हणजे ताडपत्री असावी असे मला वाटले होते. म्हणून मी कांहीच विचारले नव्हते. मला माहित असेल म्हणून आबानेही कांही सांगितले नाही.

सकाळी लवकर उठून आम्ही चालत निघालो. डेक्कन, अलका टॉकीज, टिळक रोड, स्वारगेट, चाकण आईल मिल जवळ पोचलो. तेथे ताडी डेपो होता. आबाने जगन्नाथ या मॅनेजरची ओळख करून दिली व सांगितले. हा काम करण्यासाठी आला आहे. त्याने आत नरसिंहला संगितले याला काम समजाव. नरसिंहने आत नेले.

आत लाकडी फळया जोडून हौद बनवले होते. सात हौद होते त्यात पांडरट रंगाचे पाणी होते. घाण वास सुटला होता. जवळजवळ गटाराचे पाणी असावे असे होते. हिरव्या माश्या घोंगावत होत्या. खाली पाहिले तर शाहबाद फरशी बसवलेली होती. फरशी मधले सिमेंट निघू गेलेले होते. त्यातून ते सांडलेले

पाणी वहात होते. लाकडी टाकीच्या सभोवताली दोघे दोघे मिळून ते पाणी बाटल्यात नरसाळयाने भरून लाकडी खोक्यात ठेवत होते. एका खोक्यात २४ बाटल्या असत. खोके भरले की बाहेर नेऊन ठेवायचे. बाहेर थांबलेले मजूर ते उचलून ट्रकमध्ये ठेवत होते. ट्रक भरला की कांही मजुरासह निघून जात होता.

मला एका म्हाताऱ्या मजुरासोबत काम करायला सांगितले. मी कामाला सुरवात केली. दिवसभर काम केल्यावर संध्याकाळी सहा वाजता सात रुपये रोख पगार मिळाला. मी चालत पांडवनगर येथे आलो. वहिनीला पगार देऊन टाकला. दुसरे दिवसीपासून नियमित कामास सुरवात केली.

एक दिवस माझी बहीण व भावोजी मला भेटावयास आले. त्यांनी डेपो पाहिला मग म्हणाले विद्यापीठात शिपायाच्या जागा भरावयाच्या आहेत अर्ज कर. मी अर्ज केला. मला मुलाखतीस बोलावले. ते पत्र आल्याचे मला भागवतने(भाऊ) मुलाखतीचे दिवसी सकाळी ४ वाजता सांगितले. मी कामाला जायचे रद्द करून सकाळी विद्यापीठात गेलो. बहीण घरी होती. पण भावोजी बाहेर गेलेले होते. त्यांची भेट झाली नाही. विद्यापीठ कार्यालय बाहेरून पाहिले होते. नेमकी मुलाखत कोठे द्यायची माहित नव्हते. मुलाखत मुख्य कार्यालयात होती. चौकशी करून मुलाखतीस गेलो. बाहेर आम्ही सात ते आठ जण होतो तेथे चर्चा सुरु होती. मी एकत होतो. एकाने सांगितले की फक्त खुर्चीवर बसायचे नाही. बाकी कांही बोलले नाही तरी चालते, खुर्चीवर बसले की हाकलून देतात. मला कसलाही अनुभव नव्हता. कोणाचे मार्गदर्शन मिळाले नव्हते. मला आत बोलावले. तिघेजण बसलेले होते. आत जाताच तिघांनीही खुर्चीवर बसण्याचा आग्रह केला, मी खुर्चीवर बसलो नाही मग त्यांनी नाव पत्ता शिक्षण विचारले. मी सर्व सांगितले. मला बाहेर जाण्यास सांगितले.

मी बहिणीकडे गेलो मुलाखतीबाबत सांगितले. दुपारी भावोजी आले. ते म्हणाले मी त्याच बिल्डिंगमध्ये होतो, मला का नाही भेटलास. मला उशीर झाला

म्हणून भेटता आले नसल्याचे सांगितले. मुलाखत कशी झाली ते सांगितले. ते म्हणाले. नावालाच मुलाखत असते. दहा जागा आहेत व सात ते आठच लोक होते म्हणजे तुला नक्की घेतील.

दि. २८ फेब्रुवारी, १९८० रोजी शिपाई पदावर रुजू झालो. ही नेमणूक हंगामी स्वरुपाची होती. महाविद्यालय विकास विभागात एका शिपायाच्या रजेच्या काळातली नेमणूक होती. मी रुजू झालो. त्या कार्यालयात फक्त डॉ. एम आर भिडे साहेब, श्रीमती चव्हाणमॅडम व मी एवढेच होतो. श्रीमती चव्हाण मॅडम यांनी मला खूप सहकार्य केले. माझी पहिलीच नोकरी होती. ऑफिसचे काम कसे असते ते मला माहित नव्हते. त्यांनी मला सर्व शिकवले.

दुपारी चार वाजता मला त्या चहा देत असत. पूर्वी मी चहा पीत नसे पण त्यांच्यामुळे मी चहा पिऊ लागलो. बरे वाटत होते. त्यामुळे आलेला आळस निघून जाई. रजेवरून पूर्वीचा शिपाई कामावर रुजू होणार होता. मला खूप काळजी वाटत होती. पण त्या अगोदरच शैक्षणिक विभागातील एक शिपाई रजेवर गेला त्यामुळे मला त्याच्याजागी बदली झाली.

मी गावी जाऊन इयत्ता दहावीची परीक्षा दिली. पास झालो. सर्विसबुकमध्ये नोंद झाली. नंतर अनेक विभागात बदली होऊन मी काम केले एक वर्ष पूर्ण झाले होते. आता रजेवर कोणताही शिपाई गेलेला नव्हता. मला कामावरून कमी करण्यात येणार असल्याचे मला समजले. मी त्यावेळी प्रशासन विभागात काम करीत असल्यामुळे समजले. आदेश तयार झाला मला देण्यासाठी बोलावले. त्यांना मी सांगितले मला एक वर्ष पूर्ण झाले आहे. मी मागासवर्गीय आहे, शिवाय माझ्यापेक्षा जे जुनियर आहेत त्यांना कमी करा. मला कमी करता येणार नाही. त्यानंतर उपकुलसचिव यांनी कागदपत्रे तपासले व मला जनसंपर्क विभागात बदली केली. व तेथे नुकतेच रुजू झालेले नायर यांना कमी करण्यात आले.

मी त्या विभागात रुजू झालो. दुपारी एक व्यक्ती रागारागाने जनसंपर्क विभागात आली. कोणीतरी मोठी व्यक्ती होती. कांहीही चौकशी न करता सरळ जनसंपर्क अधिकारी यांचे केबिनमध्ये घुसली. त्यांना कोठेतरी पहिल्यासारखे वाटत होते पण आठवत नव्हते. तोच साहेबांनी बेल वाजवली मी आत गेलो.

त्या व्यक्तीने मला विचारले “रजिस्ट्रारला कधी भेटलास? मी म्हणालो “नाही भेटलो. ”

“लबाड बोलतो काय? मला सर्व माहिती आहे. एक मला सांग तुझी त्यांची ओळख कशी ?” अगदी करारी आवाजात मला विचारले.

मी म्हणालो “माझी ओळख नाही. ”

ते गरजले “बाहेर जा. ”

मला कांहीच समजत नव्हते. मी कधीही रजिस्ट्रार यांना भेटलो नव्हतो. तसा प्रसंग नव्हता. मी विचार करीत बसलो होतो. थोड्या वेळाने ती व्यक्ती निघून गेली. साहेबांना विचारणे शक्य मला बरोबर वाटत नव्हते. मग मी चौकशीच्या केबिनमध्ये बसणारे पवारसाहेब यांना विचारले. तेंव्हा त्यांनी मला त्यांची माहिती सांगितली. ते कार्यकारिणी सदस्य होते. मग ते मला असे का म्हटले हा प्रश्न सुटला नव्हता.

चार ते पाच दिवसांनी चौकशी कक्षात कोणी नसल्याचे पाहून पुन्हा पवार साहेबांना विचारले “मला ते असे का बोलले? मला लबाड म्हणाले. ” त्यावर पवारसाहेब म्हणाले मी तुला नंतर सांगतो.

कांही दिवसांनी श्री नायर मला भेटायला आला व म्हणाला “मला कामावर घेतले आहे. तेही पर्मनन्ट पोस्ट वर.” तो असे का बोलला मला समजले नव्हते.

मी म्हणालो “चांगले झाले.”

तो म्हणाला “चांगलेच होणार, माझे वरपर्यंत हात आहेत. पुन्हा माझ्या नादी लागू नको. ”

घडलेली घटना मी भावोजींना सांगितली. तेंव्हा त्यांनी मला सांगितले, “रजिस्ट्रार व ती व्यक्ती हे पूर्वीचे मित्र होते. कशावरून तरी त्यांचे वाकडे आले आहे. तुला जनसंपर्क कार्यालयात घेतल्यानंतर त्या दोघात वाद झाला. त्याचा राग तुझ्यावर काढला. परंतु तू कांही उलटसुलट बोलू नको ते खूप मोठे माणसे आहेत. ”

मी त्यानंतर तो विषय सोडून दिला. नियमित काम करीत होतो. सप्टेंबर १९८२मध्ये क्लास वन ते क्लास फोर मधील निवडक कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली होती. नायरला एक वर्ष ही पूर्ण झाले नव्हते. तसेच आणखीही बरेच जण असेच होते. ज्यांचे कार्यकारिणी सदस्याचे ओळखीचे होते. त्या सर्वांना पदोन्नती देण्यात आली. मला वगळण्यात आले होते. मी रजिस्ट्रार यांना भेटून विचारले असता त्यांनी सांगितले अर्ज करा कारवाही नक्की होईल. मी अर्ज केला, मुलाखत घेऊन माझी नियुक्ती सहाय्यक पदावर करण्यात आली. मला जुनियर असलेले सर्व सिनियर झाले होते. माझ्यावर अन्याय झाला होता.

दि. १८ ऑक्टोबर १९८२ रोजी ११-३० वाजता आदेश मिळताच मी परीक्षा विभागात ११-४०पर्यंत रुजू झालो. माझ्याबरोबर आणखी आठजण होते. सर्वांनी एकाच वेळी रुजू अहवाल दिला होता. सर्विस बुक मध्ये १८ तारखेची नोंद झाली होती. पगार स्लीपवर १८ ऑक्टोबर तारीख आली होती. कांही दिवसांनी नायर प्रशासन विभागात आलेते, त्यांनी त्याच्या मित्राच्या मदतीने त्यांनी १८ तारीख खोडून १९ केली. मी रजेची नोंद पहावयास गेलो तेंव्हा मी तक्रार अर्ज केला. नायरचा मित्र घाबरला त्याने सर्विस बुक बायंडींगला गेले असे सांगितले. त्याने ते पेज काढून त्याएवजी दुसरे पेज घालून नवीन नोंद करून खाडाखोड नाहीसी केली. पुन्हा बायंडींगला पाठवले. एक महिन्यांनी खाडाखोड नसल्याचे सांगण्यात आले. त्या घटनेमुळे माझी सिनिअरिटीत तीस ते चाळीस जण पुढे गेले.

१८ तारखेलाच नवीन नियुक्त्या झाल्या होत्या तेही माझ्यापुढे गेले. हा विषय मी तेथेच सोडून दिला. कामावर लक्ष केंद्रित केले.

माझ्या लहान बहिणीचे लग्न जमले होते. मी लग्नासाठी बचत करून पैसे मागे टाकत होतो. तोच ज्याला बहीण द्यायची होती तो पुण्याला माझ्याकडे आला व बीएड करण्यास डोनेशन द्यायचे आहे म्हणून ५ हजार मागू लागला. माझा बेसिक पगार २६० रुपये होता. कसे देणार मी एवढे पैसे?

मी त्याला स्पष्ट सांगितले " ठरल्याप्रमाणे लग्नाचा खर्च म्हणून ३ हजार देईन पण ते सुद्धा लग्नाचे वेळी" शेवटी एक हजार व येण्याजाण्याचा खर्च मागितला. मी त्याला बोलावले नव्हते. खर्च देण्याचा प्रश्नच नव्हता. माझेकडे एक हजार शिल्लक नव्हते. मी त्याला देऊ शकत नसल्याचे सांगितल्यावर तो खुपच भडकला. वाटेल तसे बोलू लागला. पाहुणा माणूस म्हणून एकुण घेतले. शेवटी मी ऑफिसला निघाल्यावर म्हणाला "निदान जाण्याच्या तिकिटाचे तरी पैसे द्या" त्याच्याकडे जाण्यासाठीही पैसे नव्हते. त्याला बँकेतून शंभर रुपये काढून दिले.

मला ते स्थळ पसंद नव्हते पण आईने जमवलेले होते. म्हणून मी गप्प बसलो होतो. शिवाय माझे भाऊ कोणीही लक्ष द्यायला तयार नव्हते. मी भागवतला पैसे मागितले त्यांनी सांगितले की पुढच्या वर्षी माझे कर्ज फिटले की नवीन कर्ज काढून देईन. भरत म्हणाला आता तू खर्च कर मी नंतर देईन. अनिरुद्ध तर बेपत्ताच होता. मी सोसायटीचे कर्ज काढले. बँकेचे कर्ज काढले. लग्नाची तयारी करण्यास गावी गेलो. खरेदीसाठी मुरुडच्या बाजारात नेमकी श्रीहरीची भेट झाली. त्याला लग्नासाठी पैसे मागितले असता तो म्हणाला "मला विक आणि पैसे घे. " एवढे बोलून तो निघूनही गेला. मी पाहतच राहिलो, कोणाला विकायचे, तो तर निघूनही गेला.

मी गावी गेलो. तयारीनिशी अंबेजोगाई जवळ एका खेडे गावात घरीच लग्न होते. त्यांचीही परिस्थिती गरीबीचीच होती. त्यांना तीन हजार रुपये द्यायचे

होते. मला खर्चाला पैसे कमी पडले म्हणून मी २८०० रुपये द्यायचे कबुल केले. तेंव्हा त्यांचा मोठा भाऊ म्हणाला २०० रुपये दिल्यानंतरच मुलगी माहेरी पाठवू. मला खूप राग आला होता पण मी शांत राहिलो. आमचेकडील एक पाहुणे बोलले "आम्ही काय मुलगी विकली का?" त्यावर खूप गोंधळ झाला. गावकरी मध्ये पडले. मी त्यांना सांगितले पुण्यात गेलो की मनीऑर्डर करतो. लग्न लागले. आम्ही गावी आलो. पुण्यात आल्यावर २०० रुपये मनीऑर्डरने पाठवून दिले.

एक वर्षात अर्धे अधिक कर्ज फेडले होते. माझ्यासाठी स्थळे येत होती. तीन मुली पाहिल्या, एक पसंद पडली मुलगी पुण्याची. दिसायला चांगली होती. पण माझेकडे पैश्याची चणचण होती कर्ज अजून फिटले नव्हते. थोडे दिवस थांबावे असे वाटत होते म्हणून मी टाळत होतो. मध्यस्त श्री शेलार विद्यापीठातच कामास होते त्यांनी मला विचारल्यावर मी माझी अडचण सांगितली. मग पाहुण्यांचा निरोप आला की लग्नाचा खर्च आम्हीच करणार आहोत. तेंव्हा बैठक घ्या. मी माझ्या भावाना बोलावून घेतले. बैठक घेतली आमचा मानपान आम्ही व त्यांचा मानपान त्यांनी करायचा. लग्न तेच करून देणार असे ठरले. मी पुन्हा सोसायटीत अर्ज केला. बँकेत अर्ज केला वजावट करून दोन्ही मिळून तीन हजारच मिळाले. तेवढ्यातच मी काटकसरीने खर्च भागवला.

क्रमशः

# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे

जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.

www. esahity. com वरून डाऊनलोड करा.

esahity@gmail. com ला कळवून मेलने मिळवा.

किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. तेdownload करा.

हे सर्व मोफ़त आहे.